**मेट्रोच्या विविध कामांना गती देण्याचे**
**अतिरिक्त महानगर आयुक्तांचे आदेश**

**मुंबई, दिनांक १८ एप्रिल, २०१८:** सातत्याने पाठपुरावा करुन मेट्रोच्या कामांना गती द्यावी, असे आदेश मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अतिरिक्त महानगर आयुक्त श्री. प्रवीण दराडे यांनी दिले.

मेट्रोच्या विविध प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी प्राधिकरणाच्या वांद्रे-कुर्ला संकुलातील कार्यालयात आज सकाळी सर्व संबंधित अधिकाऱ्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत मार्गदर्शन करताना ते बोलत होते. बैठकीसाठी श्री. आर.के. शर्मा, (संचालक प्रणाली), श्री. पी.के. शर्मा, प्रकल्प संचालक (डीएमआरसी), श्री.ए.आर. वानखडे, (उप महानगर आयुक्त, भूमि व मिळकत शाखा), श्री. तानाजी भोसले, (मुख्य अभियंता) इ. अधिकारी उपस्थित होते.

अंधेरी ते दहिसर, दहिसर ते डी.एन.नगर, वडाळा ते ठाणे-भिवंडी-कल्याण या मार्गांवर सुरु असणाऱ्या कामांच्या प्रगतीचा श्री. दराडे यांनी सविस्तर आढावा घेतला. भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण करुन जागा ताब्यात घेणे, विविध स्वरुपाचे करार करणे, रस्ते रुंदीकरण, पुनर्वसन इ. कामांसोबतच निविदा प्रक्रिया पूर्ण करण्याच्या कामी कोणताही विलंब होणान नाही याची सर्वांनी दक्षता घ्यावी असे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

---